१८ डिसेंबर २०१४

सकाळ सातारा TODAY

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# भोसले कॉलेजात तक्रार निवारण समिती

## कोरेगावात रोडरोमियोंच्या कृत्यांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने प्रयत्न

**पळशी, ता. १७ :** रोडरोमियोंच्या कृत्यांना पायबंद घालण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात विद्यार्थिनी तक्रार निवारण समिती स्थापन झाली आहे. रोडरोमियोंकडून त्रास झाल्यास विद्यार्थिनींनी या समितीकडे संपर्क साधावा, असे आवाहन करणारे फलक कोरेगावात प्रमुख ठिकाणी लावण्याचा निर्णय समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

प्राचार्य डॉ. विजय सावंत यांनी महाविद्यालयात पालक प्रतिनिधींचा समावेश असलेल्या विद्यार्थिनी तक्रार निवारण समितीची बैठक घेतली. या बैठकीस सी. आर. बर्गे, प्राचार्य अरुण बर्गे, यात्रा समितीचे अध्यक्ष शहाजीराव बर्गे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज बर्गे, रामभाऊ घार्गे, ॲड. वृषाली बगाडे, पोलिस नाईक गणेश ताटे, प्रशांत जाधव, अभय भोसले उपस्थित होते. शिक्षणासाठी येणाऱ्या सर्व विद्यार्थिनींमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणारे वातावरण महाविद्यालय परिसरात निर्माण करण्याच्या मुद्द्यावर बैठकीत प्रामुख्याने चर्चा झाली. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर थांबून टवाळी करणाऱ्या रोडरोमियोंचा बंदोबस्त व्हावा, अशी अपेक्षा बैठकीत व्यक्त करण्यात आली. महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या मोबाईल वापरावर बंदी घालावी, मोबाईलचा वापर करणाऱ्यांना दंड करावा, मोबाईलवर बोलताना चौथ्यांदा आढळून येणाऱ्यांचा मोबाईल जप्त करावा, अशा सूचना समिती सदस्यांनी बैठकीत केल्या. दत्तक पालक योजनेमध्ये प्रत्येक शिक्षकाकडे चाळीस विद्यार्थ्यांची जबाबदारी देण्यात आली आहे, अशी माहिती डॉ. सावंत यांनी दिली. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी व पालकाची इत्यंभूत माहिती महाविद्यालयाकडे उपलब्ध होणार आहे. त्यामुळे महाविद्यालयात बाहेरील कोणीही घुसखोरी केल्यास तत्काळ समजण्यास मदत होणार आहे. विद्यार्थिनींसाठी महाविद्यालयात तक्रार पेटी बसवण्याची व पोलिसांच्या मदतीने तक्रारींचा निपटारा करण्याचा निर्णय या बैठकीत झाला. महाविद्यालयात येताना अथवा जाताना रोडरोमियोंकडून त्रास झाल्यास संबंधित विद्यार्थिनींनी तक्रार निवारण समितीतील कोणत्याही सदस्याकडे तत्काळ संपर्क साधावा. त्रास देणाऱ्याच्या नावानिशी माहिती कळवावी, नाव माहीत नसेल, तर त्याचे वर्णन कळवावे. संबंधित विद्यार्थिनीचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. त्यानंतर संबंधितावर कारवाई करण्यासाठी समितीमार्फत पुढाकार घेतला जाईल. यासंदर्भात आवाहन करणारे फलक कोरेगावातील प्रमुख ठिकाणी लावण्याचा निर्णय समितीच्या बैठकीत घेण्यात आला.